Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,
Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2022, VOL- 10/73

इयत्ता ४थी विद्यार्थ्यांच्या इग्रजी व मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा मराठी लेखनाचा तुलनात्मक अभ्यास

डॉ.अतुल प्रकाश कुलकर्णी

विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, म.ए.सो. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे

प्रस्तावना :

शाळा ह्या साधारण दोन माध्यमाच्या असतात. महाराष्ट्रात मराठी व इंग्रजी या माध्यमाच्या शाळा जास्त प्रमाणात दिसून येतात. आजकाल इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाल्याचा प्रवेश करणे याकडे पालकांचा जास्त कल असलेला दिसून येतो. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार त्रिभाषा सूत्र शिक्षणात आले. यानुसार मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी ही प्रथम भाषा. तर इंग्रजी माध्यमाच्या शाळामधून ही तृतीय भाषा म्हणून शिकविली जाते.

संशोधनाची गरज :

शाळांचे माध्यम कोणतेही असो भाषा वापरताना भाषेचे जे नियम आहेत ते मात्र सारखेच आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये याविषयी किती विकास झाला आहे, भाषेकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा आहे, विद्यार्थ्यांना भाषा लिहिता येते का, दोन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये काही फरक पडतो आहे का हे तपासण्यासाठी प्रस्तुत संशोधन करण्यात आले.

उद्दिष्ट्ये :

१. विद्यार्थ्यांचे लेखन तपासणे.
२. शब्दांचे वेगवेगळे प्रकार लिहिता येतात का ते तपासणे.
३. मराठी माध्यम व इंग्रजी माध्यम या दोन्ही माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची शब्द लेखनासंदर्भात तुलना करणे.

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

न्यादार्ष :

प्रस्तुत सोशोधानासाठी सहेतुक पद्धतीने दोन्ही माध्यमाच्या प्रत्येकी ५ शाळा निवडण्यात आल्या. मराठी माध्यमाच्या शाळामधून एकूण १८२ विद्यार्थी व इंग्रजी मध्यामच्या शाळामधून एकूण १९५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

संशोधन कार्य पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला.

संधोधन साधन :

प्रस्तुत संधोधन करण्यासाठी एक संपादन चाचणी तयार करण्यात आली. यामध्ये जोडाक्षरे, चार अक्षरांचे शब्द, दोन अक्षरांचे शब्द, तीन अक्षरांचे शब्द काना असलेले शब्द, वेलांटी असलेले शब्द, उकार असलेले शब्द असे प्रश्न विचारण्यात आले.

चाचणीचे मापन :

संशोधकाने चाचणीतील शब्द वाचून दाखविले व विद्यार्थ्यांना लिहिण्यास सांगितले. यामध्ये जोडाक्षरे, चार अक्षरांचे शब्द, दोन अक्षरांचे शब्द, तीन अक्षरांचे शब्द काना असलेले शब्द, वेलांटी असलेले शब्द, उकार असलेले शब्द अश्या प्रकारात प्रत्यकी १० प्रश्न विचारण्यात आले होते. प्रत्येक प्रश्नाला एक गुण यापध्तीने गुडन योजना करण्यात आली होती.

माहितीचे विश्लेषण :

१. जोडाक्षरे

माध्यम	बरोबर उत्तरे %
मराठी	४७
इंग्रजी	३८

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies



विश्लेषण : मराठी माध्यमाच्या फक्त २७% विद्यार्थ्यांना जोडाक्षरे बरोबर लिहिता आली. तर इंग्रजी माध्यमाच्या २८ % विद्यार्थ्यांना जोडाक्षरे बरोबर लिहिता आली. म्हणजेच दोन्ही माध्यमांच्या विद्यार्थ्यांना जोडाक्षरे लिहिण्या प्रगती दिसून येत नाही.

२. शब्द लेखन

माध्यम	चार अक्षरी बरोबर शब्द %	तीन अक्षरी बरोबर शब्द %	दोन अक्षरी बरोबर शब्द %
मराठी	८५	९२	१००
इंग्रजी	७०	८८	९८



विश्लेषण : चार अक्षरी शब्द मराठी भाषेतील ८५ टक्के तर इंगजी माध्यमाच्या शाळेतील ७० टक्के विद्यार्थ्यांना बरोबर लिहिता आली.

तीन अक्षरी शब्द मराठी भाषेतील ९२ टक्के तर इंगजी माध्यमाच्या शाळेतील ८८ टक्के विद्यार्थ्यांना बरोबर लिहिता आली.

दोन अक्षरी शब्द मराठी भाषेतील १०० टक्के तर इंगजी माध्यमाच्या शाळेतील ९८ टक्के विद्यार्थ्यांना बरोबर लिहिता आली.

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

तिनही प्रकारच्या शब्द लिखाणामध्ये मराठी मध्यमातील विद्यार्थी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांपेक्षा जास्त प्रमाणात शब्द लिही शकतात.

३. वेलांटी असलेले शब्द

माध्यम	बरोबर उत्तरे %
मराठी	७२
इंग्रजी	४९



विश्लेषण : मराठी माध्यमाच्या फक्त ७२% विद्यार्थ्यांना वेलांटी असलेले शब्द बरोबर लिहिता आले. तर इंग्रजी माध्यमाच्या ४९ % विद्यार्थ्यांना वेलांटी असलेले शब्द बरोबर लिहिता आले

४. उकार असलेले शब्द

माध्यम	बरोबर उत्तरे %
मराठी	६८
इंग्रजी	४२



विश्लेषण : मराठी माध्यमाच्या फक्त ६८% विद्यार्थ्यांना उकार असलेले शब्द बरोबर लिहिता आली. तर इंग्रजी माध्यमाच्या ४२ % विद्यार्थ्यांना उकार असलेले शब्द बरोबर लिहिता आले.

निष्कर्ष :

१. मराठी व इंग्रजी दोन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यांना जोडाक्षरे व्यवस्थित लिहिता येत नाहीत.

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

२. चार अक्षरी, तीन अक्षरी व दोन अक्षरी शब्द लिहिताना मराठी मध्यमाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थांपेक्षा जास्त शब्द लिहिता येतात.

३. इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी दोन अक्षराचे शब्द जेव्हढे लिही शकतात तेव्हढे चार अक्षरी शब्द लिहित नाहीत.

४. वेलांटी असलेले शब्द मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांपेक्षा जास्त लिहिता येतात मात्र तुलेनेने प्रमाण कमीच आहे.

५. उकार असलेले शब्द मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांपेक्षा जास्त लिहिता येतात मात्र तुलेनेने प्रमाण कमीच आहे.

६. दोन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये लेखन अजून पुरेसे विकसित झालेले नाही.

कारणमिमासा :

१. विद्यार्थी लेखनाचा कंटाळा करतात.

२. लिखाणाचा सराव खूप कमी पडतो,

३. फक्त पाहून लिहायची सवय लागली आहे.

४. तंत्रज्ञानाच्या सहायाने लेखन अपोआप पूर्ण वाक्यात होते. त्यामुळे नक्की काय लिहिले हे लक्षात येत नाही.

शिफारशी :

१. विद्यार्थांना सतत लेखनाचा सराव किला पाहिजे.

२. तोंडी सांगून विद्यार्थ्यांना लिहिण्यास सांगितले पाहिजे.

३. तंत्रज्ञानाचा वापर लहान वयात लिखाणासाठी करण्यावर मर्यादा आणाव्यात. हे करण्यासाठी शिक्षकांनी पालकांचे सहकार्य मोढ्या प्रमाणावर घ्यावे.

४. घरी विद्याथी व्यवस्थित लिहितो आहे न हे पहाण्यासाठी आईवडिलांची पण कार्यशाळा घेऊन त्यांना प्रशिक्षण द्यावे.

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

संदर्भ :

करंदीकर सुरेश व मंगळूलकर मीना, (२००६) प्रथम भाषा प्रादेशिक भाषा मराठी, दुसरी आवृत्ती, कोल्हापूर, फडके प्रकाशन

सोहनी चित्रा, (२००५), भाषिक कौशल्यांचा विकास, पुणे, नित्यनूतन प्रकाशन,

मराठीचा भाषिक वापर, (२००६) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक

मराठी बालभारती, इयत्ता पहिली ते चौथी ,महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies